**पाहिजेत**

दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET


Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२७७ ■ शनिवार, दि. २५ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -277 ■ Saturday, 25 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## ज्येष्ठ साहित्यिक, माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचे निधन



वैचारिक परंपरांचा काळ चिमटीत पकडून सर्वसामान्य वाचकापर्यंत तो सोप्या पद्धतीने पोहचविण्यासाठी सातत्याने काम करणारे ज्येष्ठ साहित्यिक व माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचे शनिवारी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते. देशाची राजकीय स्थिती यामध्ये हैदराबाद संस्थानातील मराठवाडा समजून घेऊन या भागाचा इतिहास, सामाजिक, राजकीय वास्तव आपल्या लेखनातून मांडणारे चपळगावकर गेल्या काही महिन्यापासून कर्करोगाशी झुंज देत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन विवाहित कन्या, नातवंडे असा परिवार आहे.

नरेंद्र पुरुषोत्तम चपळगावकर यांचा जन्म १९३८ चा. वडील हैदराबाद स्वातंत्र्य चळवळीतील नेते होते. स्वातंत्र्य चळवळीतील अनेक बारकावे माहीत असणाऱ्या चपळगावकरांनी राजकीय आणि वैचारिक परंपरा हेच लेखनाचे केंद्रस्थान मानले. विधि आणि मराठी या विषयातील पदवी संपादन केल्यानंतर सुरुवातीच्या काळात लातूरच्या दयानंद महाविद्यालयात त्यांनी मराठीचे प्राध्यापक म्हणून तर नंतर छत्रपती संभाजीनगर येथील माणिकचंद्र पहाडे विधि महाविद्यालयातही अध्यापनाचे काम केले. २८ वर्षे वकिली व्यावसाय केल्यानंतर १९ जानेवारी १९९० रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी त्यांची निवड झाली. मराठवाड्यातील साहित्य आणि वाङ्मयीन विश्वाला वळण देण्यात न्यायमूर्ती चपळगावकरांचा मोठा वाटा राहिला.

**लातूरमधील पीकविमा घोटाळ्याला परळीतून खतपाणी!**

राजहंसचा 'श्री. ग. माजगावकर स्मृती' हा वैचारिक लेखनासाठी पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे जीवन गौरव पुरस्कार ,महाराष्ट्र फाऊंडेशन या संस्थेचा दिलीप चित्रे स्मृती पुरस्कार आणि अखिल भारतीय साहित्य महामंडळाचा राम शेवाळकर स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेल्या नरेंद्र चपळगावकर हे वर्धा येथील ९६ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. आपल्या लिखाणातून भारतीय स्वातंत्र्याचा काळ आणि नेतृत्व या विषयीचे त्यांचे चिंतन प्रेरणादायी मानले जाते. कविता, कथा लिखाणाने सुरुवात करणारे नरेंद्र चपळगावकर यांनी आपले वैचारिक लिखाण कधीही दुर्बोध होणार नाही, याची काळजी घेतली. त्यांची एकूण ३६ पुस्तके प्रकाशित झाली होती. यामध्ये तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या वरील चिरत्रात्मक लिखाण असणारे कर्मयोगी सन्यासी, भाषाविषयक, साहित्य आणि समीक्षा या क्षेत्रातील दीपमाळ, नामदार गोखले यांच्यासह पंडित जवाहरलाल नेहरु व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या विषयीचे कमालीचे औत्सुक्य त्यांच्यामध्ये होते. त्यातून त्यांनी नेहरू आणि पटेल यांच्या कार्यकतृत्वाचा मांडलेला आढावा प्रेरणादायी होती. अनंत भालेराव आणि दै. मराठवाडा यांच्याविषयी ते भरभरुन बोलत. त्यांनी अनंत भालेराव यांच्याविषयीचे चरित्र्यात्मक लिखाण केले होते.

# तुळजाभवानी मंदिरातील दागिने वितळवण्याची मागणी हायकोर्टाने फेटाळली!


**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या तिजोरीतील सोने आणि चांदी वितळवण्याची धाराशीव जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली मागणी मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने फेटाळली आहे. न्यायाधीश मंगेश पाटील आणि शैलेश ब्रह्मे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

सोने-चांदी वितळवण्याच्या शासकीय निर्णयाला हिंदु जनजागृती समितीने कडाडून विरोध केला होता. भक्तांच्या श्रद्धेचे रक्षण व्हावे आणि देवस्थानातील अपहार उघडकीस यावा यासाठी समितीने न्यायालयात याचिका दाखल केली होती, अशी माहिती समितीच्या वतीने न्यायालयीन लढा देणारे मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता उमेश भडगावंकर यांनी दिली.

या संदर्भात अधिक माहिती देतांना हिंदु विधीज्ञ परिषदेचे संस्थापक सदस्य आणि मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी म्हणाले की, तुळजापूर देवस्थानात वर्ष १९९१ ते २००९ या कालावधीत तत्कालीन विश्वस्त, सरकारनियुक्त अधिकारी, लोकप्रतिनिधी, ठेकेदार या सर्वांनी मिळून ८ कोटी ५० लाख रुपयांचा अपहार केला आहे. हा अपहार झाल्यानंतर प्रशासकीय स्तरावरून त्यांच्या विरोधात गुन्हा नोंद करणे किंवा आर्थिक वसुली करणे अशी कोणतीच कृती होत नव्हती. त्यामुळे या संदर्भात हिंदु जनजागृती समितीने मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाकडे याचिका प्रविष्ट केली होती. या याचिकेत ८ ठेकेदार, ८ सरकारनियुक्त प्रशासक तथा जिल्हाधिकारी





आणि तहसीलदार यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्याची मागणी केली होती. त्यावर न्यायालयाने निर्णय देत ९ मे २०२४ या दिवशी या सर्वांच्या विरोधात फौजदारी गुन्हे नोंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर वर्ष २००९ ते २०२४ या कालावधीतील सोने, नाणी वितवळण्यास अनुमती मिळावी, असे याचिका धाराशीव जिल्हाधिकारी यांनी संभाजीनगर खंडपीठाकडे केला. ही अनुमती देण्यात येऊ नये यांसाठी हिंदु जनजागृती समितीने कडाडून विरोध केला होता.

वर्ष १९९१ ते २००९ या कालावधीत जो गैरव्यवहार-भ्रष्टाचार, अपहार झाला आहे तो उघड होऊ नये म्हणून, तसेच त्याचा अपहार करता यावा म्हणूनच हे सोने वितळण्याची अनुमती मागण्यात आल्याची दाट शंका आहे, असे म्हणणे समितीने याचिकेत मांडले होते. याचसमवेत संभाजीनगर खंडपीठाने अपहाराच्या संदर्भात गुन्हे नोंद करण्याच्या दिलेल्या आदेशाच्या विरोधात सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले असून ती सुनावणी अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे धाराशीवच्या जिल्हाधिर्कायांचा सोने वितवण्याचा अर्ज संमत करण्यात येऊ नये, अशी म ागणी अधिवक्ता सुरेश कुलकर्णी आणि अधिवक्ता उमेश भडगावकर यांनी समितीच्या वतीने केली होती.

**समितीच्या प्रयत्नांमुळे भक्तांच्या श्रद्धेचे रक्षण**

– ''हिंदु जनजागृती समितीने भक्तांच्या श्रद्धेचे रक्षण केले आहे. हा विजय म्हणजे न्यायव्यवस्थेवरील भक्तांचा विश्वास अधिक दृढ करणारा आहे. समितीच्या प्रयत्नांमुळे देवस्थानातील अपहार आणि भ्रष्टाचार रोखण्यास हातभार लागला आहे. श्री तुळजाभवानी देवीच्या संपत्तीचे रक्षण आणि अपहार करणार्यांवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी आम्ही न्यायालयीन लढा सुरूच ठेवू,ङ्क असे समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक सुनील घनवट यांनी सांगितले.

# दोन लाख बांगलादेर्शीना जन्म दाखल्याचे वाटप; भाजपा नेते किरीट सोमय्या यांचा गंभीर आरोप

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोप बांगलादेशी असल्याचा आरोप झाल्यानंतर आता महाराष्ट्रात किती बांगलादेशी घुसखोर आहेत, याची चर्चा सुरू झाली. भाजपा नेते किरीट सोमय्या हे या प्रकरणी पाठपुरावा करत असून ते विविध जिल्ह्यांचा दौरा करत आहेत. राज्यात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्या मुस्लीमांना बनावट जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. मालेगावपासून याची सुरुवात झाली असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला. म ालेगावमधील दोन राजकीय नेते, दहशतवादी संघटनेचे नेते आणि सीमेवरील दोन एजंट यात सामील आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एटीएसची स्थापना केली आहे. जे बांगलादेशी रोहिंग्या खरी प्रमाणपत्रे सादर करू शकणार नाहीत, त्यांना पुन्हा बांगलादेशमध्ये पाठविले जाणार आहे. बांगलादेशी रोहिंग्यांना बनावट जन्म प्रमाणपत्र दिल्याबद्दल नुकतेच मालेगावचे तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांना निलंबित करण्यात आले आहे. मालेगावप्रम ाणेच इतर ठिकाणीही आता कारवाई होणार असून काही अधिकाऱ्यांचे निलंबन होणार असल्याचे सुतोवाच सोमय्या यांनी केले आहे. एका बाजूला अधिकाऱ्यांवर कारवाई दुसऱ्या बाजूला या बांगलादेशींना परत पाठवण्याचे काम केले जाणार आहे. तसेच यापुढे जन्म प्रमाणपत्र देत असताना व्यवस्थित लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले.

रोहिंगे, बांगलादेर्शीना जन्म प्रम ाणपत्रे दिल्याचा ठपका; मालेगावचे तहसीलदार,नायब तहसीलदार निलंबित

किरीट सोमय्या यांनी जिल्ह्यानुसार जन्म प्रमाणपत्र वाटल्याची आकडेवारी दिली. ते म्हणाले, यवतमाळला १३,५००, अमरावती आणि अकोलामध्ये १५,००० लोकांना प्रम ाणपत्र दिले गेले आहे. तर अकोला शहरात साडेचार हजार लोकांना प्रमाणपत्र मिळाले आहे. अमरावतीमधील गाव अंजनगाव सुर्जीमध्ये २२ हजार मुस्लिमांची संख्या असून त्यात १,४८० बांगलादेशी मुस्लीम आहेत. महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार असताना बांगलादेशाच्या सीमेवरील एजंट यांनी मोठे षडयंत्र आखले. लोकसभेत यांचे अधिक खासदार निवडून आल्यानंतर आता त्यांचे सरकार येणार या विचाराने त्या चार-पाच महिन्याच्या काळात महाराष्ट्रात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्यानी अर्ज केला होता. यापैकी १ लाख ७ हजारांना जन्म प्रमाणपत्र देण्यात आले, असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला.

# पुण्याहून मित्राचा वाढदिवस साजरा करून घरी जाणाऱ्या ६ जणांवर काळाचा घाला

पुणे : पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्यातील वडगाव पुलावर भीषण अपघात झाला आहे. उभ्या असलेल्या बसला मागून स्विफ्ट कारने धडक दिल्याने हा अपघात झाला. या दुर्घटनेत दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून ४ तरुण गंभीर जखमी असल्याची माहिती समोर आली आहे.

आज सकाळी ५ च्या सुमारास बाह्यवळण महामार्गावर वडगाव ब्रिज जवळ थांबलेल्या बसला मागून येणाऱ्या स्विफ्ट कारने धडक दिली. मित्राच्या वाढदिवसानिमित्त गाडी घेऊन हे ६ मित्र फिरायला गेले होते. रात्री वाढदिवस साजरा करून ते पुण्याच्या दिशेने रवाना झाले. पुण्याच्या दिशेने जाताना वडगाव पुलाजवळील एका उभ्या असलेल्या बसला स्विफ्ट कार धडकली. या कार मध्ये ६ मित्र होते.

दोघांचा जागीच मृत्यू झाला असून ४ मित्र गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. घटनेचे प्रसंगावधान दाखवत आजूबाजूच्या नागरिकांनीही अपघातग्रस्त तरुणांना रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी मदत केली. दरम्यान स्विफ्ट चालक नशेत होता की डुलकी लागल्याने हा अपघात घडला याचा पोलीस तपास करत आहेत.

## सैनिक कल्याण सेवा आता ऑनलाईन;नावनोंदणीचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर** – सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीर नारी, वीर माता, वीर पिता व अवलंबित यांची सैनिक कल्याण कार्यालयातील, सैनिक विभागातील तसेच केंद्रीय सैनिक बोर्डातील सर्व कामे येत्या एका महिन्याच्या काळात ऑनलाईन होणार आहेत. त्यामुळे सर्वांनी सैनिक कल्याण विभाग पोर्टल वर नोंद करुन अर्ज व अपलोड केलेल्या सर्व संबंधित कागद पत्राची प्रत व दोन (२.५द२ सेमी) साईजचे लाल पार्श्वभूमी असलेले फोटो जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे द्यावे. त्यामुळे दि.१ फेब्रुवारी पासून शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यास अडचण उद्भवणार नाही. ऑनलाईन नाव नोंदणी (On Line Registration) करण्यासाठी www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन DSW Portal वर Register करावे त्यानंतर Register ESM / Register De{andent / Register Or{han / Register widow मध्ये जाऊन आपली नोंदणी करावी.

# भंडारा आयुध निर्माणीत स्फोट; आठ ठार



**भंडारा :** जिल्ह्यातील जवाहरनगर आयुध निर्माणीत झालेल्या भीषण स्फोटात आठ कामगारांचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत. रात्री उशीरा बचावकार्य थांबविण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

आयुध निर्माणीच्या अतिसंवेदनशील 'एलपीटीई सेक्टर'मध्ये सकाळी १०च्या सुमारास अचानक मोठा स्फोट झाला. यामुळे जमिनीत मोठा खड्डा पडला आणि संपूर्ण इमारत एका क्षणात कोसळली. घटनेची माहिती मिळताच भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्यासाठी 'एसडीआरएफ' तसेच नागपूर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना पाचारण करण्यात आले. ढिगाऱ्याखाली आठ जणांचे मृतदेह आढळून आले. चंद्रशेखर गोस्वामी (५९), मनोज मेश्राम (५५), अजय नागदेवे (५१), अंकित बारई (२०), लक्ष्मण केलवडे (३८), अभिषेक चौरसिया (३५), धर्मा रंगारी (३५) आणि संजय कारेमोरे (३२) अशी त्यांची नावे आहेत. अंकित हा वाणिज्य शाखेचा विद्यार्थी काही महिन्यांपासून शिकाऊ उमेदवार म्हणून कामाला लागला होता. त्याच्या मृत्यूमुळे साहुली गावावर शोककळा पसरली. दुर्घटनेत एन. पी. वंजारी, संजय राऊत, राजेश बडवाईक, सुनील कुमार यादव, जयदीप बनर्जी जखमी झाले आहेत.

स्फोटानंतर भोंगा वाजताच वसाहतीतील अनेकांनी घराबाहेर पळ काढला. स्फोटामुळे परिसरातील अनेक घरांच्या भिंतींना भेगा पडल्या तर काही ठिकाणी लाद्यांचे तुकडे झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. परिसरातील १० गावांमध्ये स्फोटाचे हादरे जाणवले. घरांवरील सिमेंट पत्र्याचे तुकडे इतरत्र पडले. स्फोटाची माहिती मिळताच कामगारांच्या कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतल्याने परिसरात गोंधळाची स्थिती होती.

आयुध निर्माणीतील स्फोटाची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रति माझ्या सहवेदना, जखमी कर्मचारी लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना करतो. बाधितांच्या मदतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.


**– राजनाथ सिंह, संरक्षणमंत्री**

संरक्षण दलाबरोबरच जिल्हा प्रशासन मदतकार्यात सहभागी आहे. वैद्याकीय मदतीसाठीसुद्धा पथक सज्ज ठेवले आहेत. मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखम ींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना.

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

## अभिनेत्री ममता कुलकर्णीने घेतला संन्यास

प्रयागराज : महाकुंभमेळ्यातून एक मोठी बातमी आली आहे. बॉलिवूडमध्ये ९० चे दशक गाजवणारी अभिनेत्री ममता कुलकर्णी हिने धार्मिक विधी करुन संन्यास घेतला. आता ती किन्नर आखाड्याची महामंडलेश्वर श्री यमाई ममता नंदगिरी झाली आहे. किन्नर आखाड्याच्या आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण यांनी ही माहिती दिली.



स्वतःचे पिंडदान केल्यानंतर ममता कुलकर्णीने संन्यास घेतला. ममताचा पट्टाभिषेक झाला. यानंतर ममताला धार्मिक विधी करुन महामंडलेश्वर केल्याचे जाहीर करण्यात आले. ममताला किन्नर आखड्याची सदस्य म्हणून नवे नाव देण्यात आले आहे. हेच नाव आता ममताची ओळख असेल. ती साध्वी प्रमाणे जीवन जगणार आहे. अभिनय क्षेत्रात नशीब आजमावल्यानंतर ममता मागील २४ – २५ वर्षांपासून परदेशात वास्तव्यास होती. ममतावर अमली पदार्थांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असल्याचा आरोप झाला. पण हा आरोप सिद्ध झाला नाही. आता प्रदीर्घ काळानंतर मायदेशी परतलेली ममता संन्यास घेऊन एका नव्या आयुष्याला सुरुवात करत आहे. मागील वर्ष – दीड वर्षापासून ममता कुलकर्णी किन्नर आखाडा आणि महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण यांच्या संपर्कात होती. प्रदीर्घ चर्चेअंती ममताने संन्यास घेण्याचा निर्णय घेतला.

## स्मरण बाळासाहेबांचे...

सत्तरच्या दशकातला ६६-६७ चा काळ! 'बजाव पुंगी हटाव लुंगी' हा आवाज देत मुंबई शहरातला मराठी तरुण उभा झाला. पहाडाला धडक देण्याची ईर्षा त्याच्या मनात जागली होती. 'मी माझ्या समाजाची अवहेलना थांबवू शकतो, महाराष्ट्राला मी महान बनवू शकतो!' असा विश्वास त्या तरुणांच्या मनात जागला होता. हे सारं घडलं होतं बाळासाहेब ठाकरे या माणसामुळं! महाराष्ट्रानं भले भले 'मैदान गाजवू' वक्ते बघितले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा आवेश, आचार्य अत्र्यांचा सोलून काढणारा विनोद, प्रबोधनकारांच्या वाणीतली आग आणि व्यंगचित्र काढण्याचा सराव असल्यानं सहजपणे धोतराला हात घालणारी भाषा वापरण्याची सवय यांचं हे अजब रसायन मात्र नवं होतं, ते तरुणांना हवं होतं. बाळासाहेब तेव्हा शाल पांघरत नसत. उलट पोशाख आणि सगळाच आविर्भाव व्यंगचित्रकाराचाच होता. पण महाराष्ट्रावर, मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायानं हा माणूस नुसता धगधगला होता. हे सारं थांबविण्याची जणू होड घेऊनच मैदानात उतरला होता. आई भवानीचा आशीर्वाद पाठीशी असल्याचं बाळासाहेब सांगायचे. पण पाठीशी प्रबोधनकारांचा, वडिलांचा आशीर्वाद आणि त्यांचीच परंपरा होती. बाळासाहेब बघता बघता साऱ्या लढाऊ मराठी तरुणांचे सेनापती झाले. ही पोरं साधीसुधी नव्हती. बाळासाहेबांच्या शब्दासाठी प्राण द्यायची त्यांची तयारी होती. त्यावेळी कलानगरातल्या 'मातोश्री' बंगल्याचं अस्तित्व नव्हतं. रानडे रोडवरच्या इवल्याशा जागेतली एक खोली हा सेनापतींचा दरबार! बाहेर छात्या फुगवलेल्या मावळ्यांची ही झुंबड. आपल्या नेत्याला आपणच मोठा करायचा हे स्मरून वागणारे हे मावळे! येणाऱ्याला आपल्या नजरेच्या जरबेनं जोखणारे, त्याला पायातले चपला-बूट काढून ठेवायला लावणारे. बाळासाहेबांशी कुणी जादा सलगी दाखवू नये याची काळजी घेणारे, मी गेलोय या दरबारात. बाळासाहेबांना अगदी लवून मुजराही केलाय. संयुक्त महाराष्ट्र होऊनही मराठी नेते ताठ मानेनं दिल्लीत उभे होत नव्हते. नेहमीप्रमाणे वितंडवाद घालून संयुक्त महाराष्ट्र समिती नावाची ताकद आम्हीच नष्ट केली होती. आचार्य अत्र्यांचं सामर्थ्यही ओसरलं होतं. अशावेळी मराठी मनाला उभारी देणारा आवाज होता फक्त नि फक्त बाळासाहेब ठाकरे यांचा! हा महाराष्ट्र लाचार लतकोडग्या नेत्यांनी कंबरेत मोडला होता. त्याला हात धरून 'ऊठ वीरा, तुझा कणा सह्याद्रीचा आहे. आम्ही तुला वाकू-झुकू देणार नाही...!', असा विश्वास देत बाळासाहेब हर हर महादेवची ललकारी घुमवत होते. त्यांच्यापुढं मस्तक झुकवण्यातसुद्धा एक थरार होता. मुंबईतच नव्हे, साऱ्या मराठी मुलुखात बाळासाहेब यांचा आवाज जायलाच हवा, असं मानून मी मराठी माणसाच्या हितासाठी झुंजणाऱ्या शिवसेनेच्या बाजूनं उभाही झालो. फारच थोडे बोटावर मोजता येतील असे मराठी पत्रकार शिवसेनेच्या साहाय्याला उभे होते. बाकी एकजात विरोधात. इंग्रजी वृत्तपत्रांनी तर शिवसेनेविरुद्ध अपप्रचाराचा आगडोंबच उभा केला होता. प्रांतवादी, राष्ट्रविघातक, ऐक्यावर आघात करणारी, फॅसिस्ट, गुंड सेना असा गजर चालला होता. विविध पक्षांचे राष्ट्रीय पुढारी ह्या संघटनेविरुद्ध सतत बोलत होते पण शिवसेनेला मराठी तरुणांनी आपलं म्हटलं होतं! बाळासाहेबांना साथ देण्याचा त्यांचा निर्धार होता. प्रारंभाला मुंबई-ठाणे एवढाच शिवसेनेचा, अन् बाळासाहेबांचा व्याप होता. पण दणका असा जबरदस्त होता की, सारा देश डोळे विस्फारून शिवसेनेकडं, बाळासाहेबांकडं बघत होता. त्यांची ही निर्माण झालेली ताकद कशी वापरायची, केव्हा वापरायची याचाही विचार सुरू होता. शिवसेनेला आजवर बहुतेक सगळ्याचराजकीय पक्षांनी आपल्या स्वार्थासाठी वापरलंय, आपल्या गरजेपोटी आपलं म्हटलंय. कम्युनिस्टांचा कामगार भागातला दबदबा मोडून काढण्यासाठी काँग्रेसवाल्यांनी शिवसेना वापरली. प्रजा समाजवाद्यांनी शिवसेनेशी तर युतीच केली होती. समाजवादी नेते मधू दंडवते त्यावेळी शिवसेनेच्या समर्थ राष्ट्रवादाची भलामण करीत होते.

सगळ्यात शेवटी हिंदुत्वाचं राजकारण करणाऱ्या भाजपेयी मंडळींनी शिवसेना वापरली. आणि तेव्हापासून शिवसेना पचवायची उमेद धरून आजही भाजपेयी नेते शिवसेनेकडे बघून जिभल्या चाटत असतात. त्यामुळं त्यांनी फुटीरांना हाताशी धरून आपलं साध्य साधलं होतं. शिवसेनेचा विचार हा केवळ बाळासाहेब ठाकरे यांचाच विचार होता आणि आजही आहे. मराठी माणसापासून हिंदुत्वापर्यंतचा शिवसेनेचा प्रवास झालाय. मुळात हिंदुत्वाचं राजकारण करताना हिंदुत्वाचा जसा आणि जेवढा विचार व्हायला हवा होता तेवढा विचार शिवसेना या संघटनेनं आणि स्वतः बाळासाहेब ठाकरे यांनी केलेला नाही. त्यांच्याभोवती राष्ट्रीय स्वयंसेवक संघातली काही मंडळी जमा झाली होती. त्यांनी बाळासाहेबांसाठी नव्हे तर बाळासाहेबांभोवती जमलेल्या मराठी तरुणांसाठी हे हिंदुत्वाचं जाळं लावलं होतं. मिळतील तेवढे शिवसैनिक भाजपकडं वळविण्याचा हेतू धरूनच हे हिंदुत्वाचं राजकारण आजतागायत सुरूच आहे. भाजपेयी नेत्यांनी आपला कावा अनेकदा आपल्या कृत्यांतून दाखवून दिलाय. बाळासाहेबांचा 'हिंदुहृदयसम्राट' ह्याच मंडळींनी बनवलाय. हिंदुत्व हे पाऱ्यासारखं आहे, ते जेवढ्या झटकन एकत्र येतं तेवढ्याच झटकन असंख्य स्वतंत्र गोलात विभागलं अन् विखुरलंही जातं. हिंदुत्वाचं राजकारण ही सोपी गोष्ट नाही. हिंदूंना एकत्र आणण्यासाठी जो संवाद साधायला हवा तो साधण्यासाठी जो प्रवास आणि प्रयास वैचारिक आणि प्रत्यक्ष करायला हवा, तो शिवसेनेत कुणी केलाय? 'हिंदुहृदयसम्राट' बाळासाहेब ठाकरे हे दादर, गिरगाव, सदाशिव-नारायण पेठ, औरंगाबाद-परभणी इथल्या जनतेला मान्य होऊ शकतील, पण हे तमाम हिंदूंना मान्य होतीलच असं त्यावेळी नव्हतं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना हिंदुहृदयसम्राट म्हणत पण हा सम्राटही अखेर फक्त पुण्या-मुंबईपुरताच उरला होता. भाषाभिन्नतेवर आणि पंथभेदावर मात करून साऱ्या हिंदूंना राजकारणापुरतं का होईना, एकत्र आणायला हवं हा विचार आजचा नाही. तो स्वातंत्र्यलढ्यापासूनचा आहे. पण तो आजवर कधीच प्रत्यक्षात येऊ शकलेला नाही. याची जाणीव हिंदुत्वाचं राजकारण करणाऱ्यांनी तरी ठेवायला हवीय. मराठी माणसाच्या काळजाला हात घालणाऱ्या आणि मराठीच्या, महाराष्ट्राच्या भल्यासाठी वाटेल ते साहस करू शकणाऱ्या एका नेत्याला हिंदुत्वाच्या स्वप्नरंजनात अडकवून महाराष्ट्राचा काही मंडळींनी घात केला होता. बाळासाहेब ठाकरे यांना हिंदुहृदयसम्राट बनवणाऱ्यांनी त्यांना आणि तमाम शिवसैनिकांना चक्क बनवलं होतं. गृहलक्ष्मी म्हणून स्त्रीला पायाची दासी बनविण्याचा प्रकार होतो, त्याच धर्तीवर म्हणायचं हिंदुहृदयसम्राट आणि बनवायचं भाजपेयींचं मांडलिक असा प्रकार यात होता.

# हजारो वर्षे जुनी माझी मराठी भाषा

**(२५ जानेवारीः माझी मराठी भाषा विशेष.)**

हृदयस्थ उत्कट भावभावना या मातृभाषेतूनच प्रकट होत असतात. पूर्वीच्या लोकांनी, थोर विचारवंतांनी आपल्या मराठी भाषेला काव्य व ग्रंथाच्या माध्यमातून अलंकृत केले. तिचे अस्तित्व कायम रहावे म्हणून अनेक जाच सोसले. आता मात्र नव्या पिढीला ती गावंढळ भाषा वाटून अन्य भाषेचा सर्रास वापर करतात. माझी मराठी किती समृद्ध आहे? यावर श्री.एन. कृष्णकुमार से.नि.प्रा.शिक्षक यांचा विशेष लेख... संपादक.

मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. ती भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. महाराष्ट्र राज्याची ती अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. सन २०११च्या जनगणनेनुसार भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे ९ कोटी आहे. मातृभाषा मराठी असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार ती जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे ती आधुनिक रूप आहे. गाथा सप्तशती हा मराठीतील २२२० वर्ष जुना पहिला ग्रंथ होय. तीचे वय किमान २५०० वर्षे इतके आहे. माझ्या या मराठी भाषेचा गौरव संतशिरोमणी ज्ञानेश्वरजींनी त्यांच्या साहित्यातूनही केलेला दिसून येतो. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून तिला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आजतागायत या भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे.




मराठी शिलालेख: राजा केसिदेवरायच्या कारकिर्दीत कोरलेला अक्षी शिलालेख हा आजवर सापडलेला मराठी भाषेतील पुराणतम शिलालेख आहे. अक्षी शिलालेखाच्या शोधापूर्वी कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या उंच मूर्तीच्या पायाशी मराठीत कोरलेला लेख- चामुण्डराजे करवियले, हा आद्य मराठी लेख समजला जात असे. अक्षी हे गाव महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील अलिबागपासून दक्षिणेस ५ किमी अंतरावर अलिबाग- मुरुड जंजिरा मार्गावर आहे. त्याचा उल्लेख इ.स.१८८३च्या कुलाबा गॅझेटियरमध्ये नोंद आहे. त्यावरील मजकूर- 'गी सुष संतु। स्वस्ति ओं। पसीमस-मुद्रधीपती। श्री कोंकणा चक्रीवर्ती। स्री केसीदेवराय। महाप्रधान भइर्जु सेणुई। तसीमीनी काले प्रव्रतमने। सकु संवतुः। ९३४ प्रधावी संवसरे: अधिकु। दिवे सुक्रे बौलु। भइर्जुवे तथा बोडणा तथा नौ।कुंवली अधोर्यु प्रधानु। महलषुमीची वआण। लुनया कचली ज।' हा राजा केसिदेवरायाचा अक्षी शिलालेख इ.स.१०१२ सालचा आहे. हा एका ओबडधोबड शिळेवर कोरला असून त्या शिळेच्या माथ्यावर चंद्रसूर्य, मजकुराखाली गद्धेगाळ व शेवटी पुन्हा चंद्रसूर्य असे कोरीवकामाचे स्वरूप आहे. तो देवनागरी लिपीत असून भाषा संस्कृत-मराठी मिश्र आहे. इंग्रजी कालगणनेनुसार या लेखाची तारीख १६ मे १०१२ अशी आहे. (अर्थ- जगी सुख नांदो. ओम पश्चिम समुद्राधीपती श्री कोकण चक्रीवर्ती श्री केसिदेवराय यांचा महाप्रधान भइर्जु सेणुई याने शक संवत ९३४ परिधावी संवत्सर अधिक मासात शुक्रवारी वद्यपक्षात देवीचा बोढणासाठी नऊ कुंवली धान्य दान केले. येथे लुनया- लेख कोरणाराचे नाव.) कुडल संगम, ता.दक्षिण सोलापूर येथील मराठी शिलालेख- 'वाछि तो विजेया होईवा।।' कुडल शब्द कन्नड असून त्याचा अर्थ संगम आहे. भीमा व सीना या दोन नद्यांचा संगमावर वसलेल्या या गावात चालुक्यकालीन संगमेश्वर मंदिर आहे. त्याची स्थिती बऱ्यापैकी असून तेथील सभामंडपातील तुळईवर अडीच ओळींचा लेख कोरलेला आहे. त्याचा काही भाग संस्कृत काही भाग मराठी आहे. शेवटचे वाक्य 'वाछि तो विजेया होईवा।।' असे मराठीत आहे. त्यात काळाचा स्पष्ट उल्लेख आहे. तेथे शके ९४० असे कोरले आहे. साधारणतः इ.स.१०१८ या काळात तो कोरला गेला असावा. श्रवणबेळगोळच्यानंतर दिवे आगार ताम्रपटाचा शोध लागला. त्याचा काळ शके ९८२ इ.स.१०६० होता. त्यानंतर कुडलच्या शिलालेखाचा शोध लागला.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

मराठी भाषेचा इतिहास: माझ्या या भाषेचा उदय संस्कृतच्या प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेचा महाराष्ट्री या बोलीभाषेपासून झाला, असे बहुतांशी मानले जाते. पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. ही भाषा देवनागरी लिपी वापरून लिहिली जाते. इ.स.१२७८मध्ये संत म्हाइंभट यांनी लीळाचरित्र लिहिले. त्यानंतर इ.स.१२९०मध्ये पवित्र ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना संत ज्ञानेश्वरजींनी केली. महानुभाव संप्रदायाने हिच्या साहित्यात मौलिक भर घातली. संत एकनाथजींनी या भाषेत भारुडे लिहिली आणि पवित्र एकनाथी भागवत, पवित्र भावार्थ रामायण आदि ग्रंथांची भर घातली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली व पेशव्यांनी या साम्राज्याचा विस्तार खुंटविला. त्यानंतर माझ्या या भाषेस राजाश्रय मिळाला. इ.स.१९४७नंतर स्वतंत्र भारत देशाने तिला अधिकृत राज्यभाषेचा दर्जा दिला. इ.स.१९६०मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंध महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि तिला राजभाषेचा मुकूट प्राप्त झाला. इतका जुना व वैभवशाली इतिहास प्राप्त आपली मराठी भाषा असतानाही अतिशिकलेले लोक आपल्या शिक्षणाचा पगडा पाडावा म्हणून अन्य भाषेत बोलतात. नागपूर, मुंबई यासारख्या शहरात मराठीचे अक्षरशः धिंडवडे निघाले आहेत. तेथीलच राहणारे, मातृभूमीही तीच, प्राथमिक शिक्षणही येथेच झालेले, वार्तालाप करणारेही याच मतीतील. मात्र मराठीलाच परकीय वागणूक दिली जात आहे. येथील मराठी अस्मिता धुळीस मिळून ती आई-वडिलांना लाथाडणारी लाजमोडी झाली आहे, याचीच खंत वाटते. माझी मराठी आता अभिजात भाषा झाली, याचा मला सार्थ अभिमान वाटतो!

# महाराष्ट्र राज्याच्या दैवताचे जनक!

शहाजीराजे भोसले हे छ.शिवाजी राजे भोसले यांचे वडील आणि मालोजी राजे भोसले यांचे ज्येष्ठ पुत्र होते. ते पराक्रम, युद्धप्रसंगीची बुद्धिमत्ता, उत्तम प्रशासन व स्वतंत्र राज्यकारभार हे मूलभूत गुण-कौशल्य असलेले ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या कारकीर्दित निजाम, मुघल आणि आदिल सत्तेत सरदार म्हणून राहिले, तरी त्यांची महत्त्वाकांक्षा स्वतंत्र राज्य स्थापनेची होती. त्यांनी तसा दोनदा प्रयत्न केला, परंतु त्यास फारसे यश आले नाही. त्यांचे स्वप्न त्यांचे पुत्र छ.शिवाजी राजे महाराष्ट्र आणि व्यंकोजी राजे तंजावर यानी प्रत्यक्षात आणले. ही ज्ञानवर्धक माहिती श्री एन. के. कुमार गुरुजी यांच्या भारदस्त शब्दांत जरुर वाचा... संपादक.



(शहाजी राजे भोसले पुण्यस्मृती विशेष)

मालोजी भोसले यांची पत्नी दीपाबाई-उमाबाई हिच्या पोटी सिंदखेड येथे, काही इतिहासकारांच्या मते वेरूळ- घृष्णेश्वर येथे शहाजींचा जन्म दि.१५ मार्च १५९४ रोजी झाला. शहाजी राजेंच्या जन्मस्थळ व जन्मतारखेबद्दल इतिहासकारांत नेहमीप्रमाणे मतभेद आहेत. बाबाजी राजे भोसले यांच्या घरात मालोजी राजे भोसले आणि उमाबाई भोसले यांच्या पोटी शहाजी राजे यांचा जन्म झाला. त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या मातोश्री उमाबाईंनी अहमदनगरजवळील शहाशरीफ पीराला अहमदनगर जवळील मुकुंदनगर भागात तारकपूर बस स्टँडपाशी नवस बोलल्यामुळे त्यांनी आपल्या दोन्ही मुलांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली. पुढे सिंदखेडराजा येथील लखुजीराव जाधव यांच्या मुलीशी म्हणजेच जिजाबाईशी शहाजीराजे यांचा डिसेंबर इ.स.१६०५मध्ये विवाह झाला. या वेळी लखुजीराव व मालोजीराजे हे दोघेही निजामशाहीत होते. पुढे लगेचच मालोजी राजेंचा दुर्दैवी मृत्यू झाला. कालांतराने जसेजसे शहाजी राजे मोठे होत गेले, तसतशी पराक्रम, राजकारण, मुत्सद्देगिरी या बाबतीत त्यांची कीर्ती वाढत सर्वदूर सुगंधासारखी पसरत गेली. मालोजी राजे भोसले हे आपला भाऊ विठोजी राजे भोसले यांचेसह सहकुटुंब सन १५७७मध्ये सिंदखेड येथे लाखुजीराजे जाधव यांच्याकडे नोकरीस आले होते. तद्नंतर शहाजींचे पिता मालोजी राजे यांनी लखुजीराजे जाधव यांची नोकरी सोडून इ.स.१५९९ साली अहमदनगरच्या निजामाची नोकरी मिळवली.

मुघल शहेनशाह औरंगजेब याने इ.स.१६२४ लष्कर खानला १.२ लाख सैन्यासह रवाना केले. सोबत आदिलशहा ८० हजार सैन्य घेऊन निघाला. शहाजी राजेंकडे २० हजार सैन्य होते. त्यातील १० हजार अहमदनगरच्या रक्षणासाठी ठेवून तेवढेच त्यांनी स्वतःकडे ठेवले. एवढ्या मोठ्या सैन्याला प्रचंड पाणी लागेल म्हणून मुघल आणि आदिलशाही सैन्याने उत्तर-दक्षिण वाहणाऱ्या मेखरी नदीजवळ भातवडी येथे छावणी उभी केली. एरवी दुष्काळग्रस्त असलेल्या अहमदनगरला तेव्हा चांगला पाऊस झाला होता. शहाजी राजेंनी छावणीच्या उत्तरेस धरणाला असे तडे पाडले, की रात्री झोपलेल्या मुघल आणि आदिलशाही छावणीची काही कळण्यापूर्वीच वाताहात झाली. तेव्हा अनेक योद्धे शहाजी राजेंचे बंदी झाले आणि त्यांचे नाव भारतवर्षात दुमदुमले. याच लढाईत त्यांचे बंधू शरीफजी धारातीर्थी पडले. भातवडी हे गाव अहमदनगरपासून पंधरा किमी अंतरावर आहे. नंतर निजामशाही वजीर, फतेह खान, जहान खान यांनी निजामाला मारले आणि राजांना निजामशाहीसाठी मिळवले. शहाजहानने दरम्यान निजामशाहीतील सगळ्या पुरुषांना ठार करविले. उद्देश असा की निजामशहीला वारस रहाणार नाही. तेव्हा राजांनी निजामच्या नात्यातील छोट्या मुर्तझाला गादीवर बसवून स्वतः कारभार हाती घेतला, जणू स्वतःवरच छत्र धारण केले. ही घटना अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील पेमगिरी किल्ल्यावर घडली. त्यांचा हा स्वतंत्र राज्यकारभार जवळजवळ तीन वर्षे टिकला होता. त्यानी मुर्तझाच्या आईला त्याच्या सुरक्षिततेची हमी दिली.

दिल्लीचा बादशहा शहाजहानने ४८ हजार सैन्य निजामशाही व आदिलशाही संपवण्यासाठी पाठवले; तेव्हा घाबरून आदिलशहा हा शहाजहानला मिळाला. शहाजी व निजामशाहीचा टिकाव लागणे शक्य नव्हते, तरीही शहाजीने नेटाने लढा चालू ठेवला. दरम्यान छोटा मुर्तझा शहाजहानच्या हाती लागला. तेव्हा त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि त्याच्या आईला दिलेल्या शब्दासाठी त्यांनी शहाजहानशी तह केला. या तहांतर्गत मुर्तझा शहाजहानकडे सुरक्षित राहील आणि शहाजी आदिलशाहीला मिळेल. शहाजहानने सावधगिरी म्हणून शहाजीराजांना दक्षिणेला बंगळूरची जहागिरी दिली. बेंगलोर विजयनगर साम्राज्य जे एक जहागिरदार, केम्पे गौडा १ यांचेद्वारे सन १५३७मध्ये स्थापित केले गेले होते, त्यांनी विजयनगर साम्राज्यामधून स्वातंत्र्याची घोषणा केली होती, त्याला सन १६३८मध्ये त्यांचा उपसेनापती, शाहजी भोसले यांच्यासोबत रानादुल्ला खान यांच्या नेतृत्वाखाली एक बड़ी आदिलशाही बीजापुर सेनाद्वारे बेंगलोरवर कब्जा केला गेला होता, ज्यांनी केंम्पे गौडा ३ यांना पराजित केले होते आणि बेंगलोरचे शाहजी यांना जहागिर- संपत्तीच्या स्वरूपात बहाल केली गेली होती. आदिलशाहीत असताना शहाजीराजांनी पुणे परगणा निजामशाहीकडून काबीज केला होता, तोही त्यांच्याकडेच ठेवला.

शहाजीराजांना बंगळूरचा प्रदेश फार आवडला. शहाजीराजे व त्यांचे थोरले चिरंजीव संभाजी राजे यांनी आपल्या मनातील स्वराज्य संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचे या ठिकाणी ठरविले. शहाजी मुळातच उत्तम प्रशासक व पराक्रमी योद्धे होते. त्यांनी दक्षिणेतील राजांवर विजय मिळवून दक्षिणेला आदिलशहीचा विस्तार केला. पण हे करताना त्या हरलेल्या राजाना शिक्षा किंवा देहदंड न करता त्यांना मांडलिक केले. त्यामुळे गरज पडली तेव्हा हे राजे शहाजींच्या मदतीला आले. राजांनी आपले पुत्र छ.शिवाजी महाराजांना पुण्यात आपल्या जहागिरीवर स्वतंत्र कारभार चालविण्यासाठी पाठवून स्वराज्य स्थापनेसाठी बरीच अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली. छ.शिवाजी राजांबरोबर बाजी पासलकर, रघुनाथ बल्लाळ अत्रे, कान्होजी जेधे नाईक व सातारचे शिंदे देशमुख हेही पुण्यात आले. राज्य कारभारासाठीची आवश्यक राजमुद्राही शहाजी राजांनीच शिवरायांना दिली. छ.शिवरायांच्या वाढत्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी आणि शहाजी राजांची यांस फूस आहे, या संशयाने आदिलशाहीने मुख्य वजीर नवाब मुस्तफाखान याने बाजी घोरपडे, मंबाजी भोसले, बाजी पवार, बाळाजी हैबतराव, फतेहखान, आझमखान यांच्या साहाय्याने शहाजी राजांना दगा देऊन कर्नाटकातील जिंजीजवळ कैद केले. साखळदंडांनी बांधून भर विजापुरातून शहाजीराजांना दरबारात हजर करण्यात आले. तो दिवस होता दि.२५ जुलै १६४८चा. हे कळताच छ.शिवाजी महाराजांनी मुत्सद्दीपणाने राजकारण करत दिल्लीत मोगल सुलतान शहाजहानला एक पत्र पाठवले. स्वतः आपण व आपले पिता शहाजी राजे हे दिल्लीपतीची चाकरी करू इच्छितात, असे त्यांनी लिहिले. या बदल्यात शहाजीराजांची विजापूरच्या कैदेतून मुक्तता करावी, ही अट घातली. अशा प्रकारे छ.शिवाजी महाराजांनी शहाजीराजांच्या सुटकेसाठी दिल्लीच्या बादशहाला मधाचे बोट लावले, हा प्रयत्न यशस्वी ठरला. शहाजीराजांची दि.१६ मे १६४९ रोजी सन्मानपूर्वक सुटका झाली. अफझलखान स्वराज्यावर चालून आला तेव्हा अफझलखानाची दगाबाजी माहिती असल्याने शहाजीराजेंनी १७ हजार फौज विजापूरबाहेर खडी ठेवली होती.

शहाजीराजांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते, की त्यांनी स्वाभिमान राखत आदिलशाही, मुघलशाही व निजामशाही या सर्व सत्ताधीशांकडे काम केले. त्यांच्या कारकिर्दीचे महत्त्वाचे टप्पे असे- सन १६२५ ते १६२८- आदिलशाही, सन १६२८ ते १६२९- निजामशाही, सन १६३० ते १६३३- मुघलशाही, सन १६३३ ते १६३६- निजामशाही, सन १६३६ ते १६६४- आदिलशाही पुढे सन १६६१ ते १६६२ दरम्यान शहाजीराजे महाराष्ट्रात आले होते. त्यांनी त्यानंतरचा काही काळ छ. शिवाजीराजे व जिजाबाईसमवेत घालवला. आपण लावलेल्या स्वराज्याच्या रोपट्याचा आज विशाल वटवृक्ष झाल्याचे पाहून ते धन्य झाले. काही काळानंतर ते पुन्हा आपल्या जहागिरीत परतले. माघ शुद्ध ५, म्हणजेच दि.२३ जानेवारी १६६४ रोजी होदेगिरीच्या जंगलात शिकारीला गेले असताना त्यांच्या घोड्याचा एका वृक्षवेली मध्ये पाय अडकला व ते खाली कोसळले आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजांनी राजपरंपरेप्रमाणे शहाजीराजांची उत्तरक्रिया केली व समाधी शिमोग्याजवळ होदेगिरी जिल्हा दावणगिरी- कर्नाटक येथे बांधली.

!! शहाजी राजेंना त्यांच्या पुण्यस्मरणदिनी विनम्र अभिवादन !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे** गुरूजी.
मु. पो. ता. जि. गडचिरोली

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष'

## वैद्यकीय मदतीसाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली, अर्जासाठीची प्रक्रिया पेपरलेस

मुंबई, दि. २४: राज्यातील गरजू रूग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात गरजूंना अत्यावश्यक आरोग्यसेवा व आर्थिक सहाय्य देण्याकरिता मंत्रालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. ही सेवा नागरिकांना त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हावी, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे.

या कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कामकाज अधिक सुलभ व पेपरलेस करण्यात येत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती श्री. नाईक यांनी दिली आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च टाळता येणार आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजू नागरिकांना अत्यावश्यक आर्थिक मदत केली जाते. या सेवांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेणे सहज सुलभ व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सुरू करण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे, कक्षामध्ये आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाबाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे व अर्थसाहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे याकरिता राज्यातील तज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यात येणार असून उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने अर्थसाहाय्याच्या रकमेचा देखील समितीमार्फत आढावा घेण्यात येणार असल्याचे श्री. नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य केले जाते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात. रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहेत. सद्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशील, सोपी होणार आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आतापर्यंत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य मिळाल्याने अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. नाईक यांनी केले आहे.

# अमेरिकेतील अवैध स्थलांतरितांना भारतात परत आणणार

### परराष्ट्र प्रवक्ते जयस्वाल यांनी स्पष्ट केली भूमिका

नवी दिल्ली : अमेरिकेतील बेकायेशीर स्थलांतरितांच्या समर्थनात भारत उभा राहणार नाही. त्यांना परत आणण्यासाठी भारत सरकार पावले उचलणार असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने आज, शुक्रवारी सांगितले.

यासंदर्भात परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, अमेरिका आणि इतरत्र निर्धारित वेळेपेक्षा जास्त काळ वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांना सरकार परत आणण्यासाठी पावले उचलेल. त्यासाठी सर्व नागरिकांच्या राष्ट्रीयत्वाची आणि कागदपत्रांची तपासणी केली जाईल. भारत बेकायदेशीर स्थलांतराच्या विरोधात आहे कारण ते संघटित गुन्हेगारीशी जोडलेले आहे.

भारत-अमेरिका संबंध खूप मजबूत आणि बहुआयामी आहेत. दोन्ही देशांमधील आर्थिक संबंधही खूप चांगले आहेत. दोन्ही देशांनी व्यापाराशी संबंधित कोणत्याही बाबींवर चर्चा करण्यासाठी यंत्रणा स्थापित केल्या आहेत. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतल्यानंतर अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतरितांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील चर्चेनुसार सुमारे १८ हजार भारतीय नागरिकांना भारतात परत पाठवले जाऊ शकते. दरम्यान परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री २६-२७ जानेवारी रोजी चीनला भेट देणार आहेत. परराष्ट्र सचिव चीनमध्ये द्विपक्षीय हिताच्या सर्व मुद्द्यांवर चर्चा करतील असे जयस्वाल यांनी सांगितले.

# गोठे बांधले पण शासन अनुदान देत नसल्याने शेतकरी हवालदिल!



रायगड : शासन आपल्या दारी योजनेच्या कार्यक्रमात राज्याच्या महिला बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते फेब्रुवारी २०२३ मध्ये महागाव ग्रामपंचायत हद्दीतील १० लाभार्थी शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जनावरांच्या गोठ्यांचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी देऊन काम सुरू करण्यास मान्यता देण्याचे पत्र देण्यात आले परंतु लाभार्थी शेतकरी यांनी गोठे बांधून आज ११ महिने होऊन गेले तरी पूर्ण अनुदान त्यांच्या पदरात अजून पडलेले नाही.

**१० शेतकऱ्यांचे रखडले अनुदान** – पंचायत समिती कार्यालयात हेलपाटे मारून शेतकरी मात्र बेजार झाला आहे गोठा बांधण्यासाठी लागणारे पत्रे, सिमेंट, रेती, विटा हे सर्व उसनवारी करून गोठे बांधले आणि आता शासन अनुदान देत नाही आहे. तळा पंचायत समितीकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत १० शेतकऱ्यांना जनावरांचे गोठे मंजूर करण्यात आले आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत शेतकऱ्यांचे रखडलेले अनुदान मिळावे यासाठी शेतकरी संघटनेने तळा पंचायत समितीचे तात्कालीन प्रभारी गटविकास अधिकारी जठार यांची भेट घेतली होती शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही तर आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता, प्रसार माध्यमातूनही प्रशासनाच्या कारभारा विरोधात ताशेरे ओढल्यानंतर तळा पंचायत समिती कार्यालयाकडून रखडलेले अनुदान वाटप करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली.

शेतकऱ्यांना कोण न्याय मिळवून देणार?

काम एक लाख ऐंशी हजाराचे मात्र पाच हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करून शेतकऱ्यांची बोळवण केली गेली, आजच्या घडीला तीन शेतकऱ्यांना १ लाख ३० हजार रुपये देण्यात आले आहेत अजूनही ७ शेतकऱ्यांना पैसे जमा झालेले नाहीत त्यामुळे प्रशासन शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याचा आरोप लाभार्थी शेतकऱ्यांनी केला आहे. शासकीय कार्यालयातील दफ्तर दिरंगाई आणि योजनांतील त्रुटी शेतकऱ्यांच्या जिवावर उठत असल्याचे दिसत आहे. तळा पंचायत समितीला गेल्या वर्ष भरात तीन गटविकास अधिकारी लाभले पण एकाही शेतकऱ्यांचे अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. तसेच आता शेतकऱ्यांना कोण न्याय मिळवून देणार का याकडेही संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे.

# राज्य शासनाच्या निर्णयाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दिलासा

मुंबई : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड) म्हणून प्रवेश घेतलेल्या प्रवेशित परंतु विहित नमुन्यामध्ये एथड प्रमाणपत्र सादर न केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशास एका वर्षासाठी विशेष बाब म्हणून ईब्ल्यूएस प्रमाणपत्र ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे ईडब्ल्यूएस प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या जवळपास १ हजार ६०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात आलेल्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड) संवर्गातून प्रवेशित झालेल्या १ हजार ६०० विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील एथड प्रमाणपत्राऐवजी केंद्र सरकारच्या नमुन्यातील एथड प्रमाणपत्र सादर केले होते. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन, केवळ या शैक्षणिक वर्षाकरिता एकवेळची विशेष बाब विद्यार्थ्यांनी सादर केलेले केंद्र सरकारच्या नमुन्यातील एथड प्रमाणपत्र या प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

## 'घर घर संविधान';उद्या (दि.२६) संविधान जाणीव जागृती रॅली

**छत्रपती संभाजीनगर** – 'घर घर संविधान' याअंतर्गत रविवार दि.२६ रोजी सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनी हे संविधान जाणीव जागृती रॅली काढणार असून राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री संजय शिरसाट हे या रॅलीला हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ करणार आहेत, असे प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवडे यांनी कळविले आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर १००० मुलांचे शासकीय वसतिगृह युनिट १,२,३ व मिलिंद व संत तुकाराम मुलांचे वसतिगृह,मुलांचे शासकीय वसतिगृह (जूने),गुणवंत मुलीचे शासकीय वसतिगृह व १००० मुलींचे शासकीय वसतीगृह,युनिट-४, छत्रपती संभाजीनगर येथील मुला-मुलींचा सहभाग असणारी संविधान जाणीव जागृती रॅली रॅली रविवार दि.२६ रोजी सकाळी सव्वा आठ वा. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर,यांच्या पुतळ्याच्या जागेपासून भडकल गेट ते महात्मा फुले चौक, औरंगापूरा पर्यंत रॅली काढण्यात येणार,अशी माहिती प्रादेशिक उपायुक्त श्रीमती जयश्री सोनकवडे यांनी दिली आहे.

# अमेरिकेतील अवैध स्थलांतरितांना भारतात परत आणणार

### परराष्ट्र प्रवक्ते जयस्वाल यांनी स्पष्ट केली भूमिका

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील बेकायेशीर स्थलांतरितांच्या समर्थनात भारत उभा राहणार नाही. त्यांना परत आणण्यासाठी भारत सरकार पावले उचलणार असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने आज, शुक्रवारी सांगितले.

यासंदर्भात परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, अमेरिका आणि इतरत्र निर्धारित वेळेपेक्षा जास्त काळ वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांना सरकार परत आणण्यासाठी पावले उचलेल. त्यासाठी सर्व नागरिकांच्या राष्ट्रीयत्वाची आणि कागदपत्रांची तपासणी केली जाईल. भारत बेकायदेशीर स्थलांतराच्या विरोधात आहे कारण ते संघटित गुन्हेगारीशी जोडलेले आहे.

भारत-अमेरिका संबंध खूप मजबूत आणि बहुआयामी आहेत. दोन्ही देशांमधील आर्थिक संबंधही खूप चांगले आहेत. दोन्ही देशांनी व्यापाराशी संबंधित कोणत्याही बाबींवर चर्चा करण्यासाठी यंत्रणा स्थापित केल्या आहेत. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतल्यानंतर अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतरितांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील चर्चेनुसार सुमारे १८ हजार भारतीय नागरिकांना भारतात परत पाठवले जाऊ शकते. दरम्यान परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री २६-२७ जानेवारी रोजी चीनला भेट देणार आहेत. परराष्ट्र सचिव चीनमध्ये द्विपक्षीय हिताच्या सर्व मुद्द्यांवर चर्चा करतील असे जयस्वाल यांनी सांगितले.

# एसटीची १४.९५ टक्के भाडेवाढ, २५ जानेवारी मध्यरात्रीपासून भाडेवाढ लागू

मुंबई : सर्वसामान्य प्रवाशांना दूरपर्यंतच्या ठिकाणांवर सुरक्षित पोहचवणाऱ्या लाल परीची अर्थात एसटी बसची शुक्रवारपासून ३ रुपयांनी दरवाढ करण्यात आली आहे. त्यामुळे गोरगरीब प्रवाशांच्या खिशाला कात्री लागणार आहे. राज्य परिवहन महामंडळाने सादर केलेल्या एसटी दरवाढीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

हकिम समितीने निश्चित केलेल्या सुत्रानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांना टप्पा वाहतूक सेवांच्या भाडेदरामध्ये १४.९५ टक्के वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही भाडेवाढ दिनांक २५ जानेवारी (२४ जानेवारी २०२५ च्या मध्यरात्रीनंतर) पासून अंमलात येईल, असे निर्देश राज्य परिवहन प्राधिकरणाने दिले आहे.

वाहनासाठी आवश्यक असलेल्या डिझेल, चेसीस, टायर या घटकांच्या किंमतीत बदल झाल्यामुळे तसेच महागाई भत्त्यात वाढ झाल्यामुळे भाडेवाढ सुत्रानुसार महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बसेसच्या प्रवासी भाडेदरात वाढ करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाच्या २७६ व्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात आला. मागील भाडेवाढ दिनांक २६ ऑक्टोंबर २०२१ रोजी करण्यात आली होती.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या तरतूदीनुसार शासनाने राज्य परिवहन प्राधिकरणाची स्थापना केली आहे. राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांची २७६ वी बैठक अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन) तथा अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण संजय सेठी यांच्या अध्यक्षतेखाली २३ जानेवारी रोजी झाली. सदर बैठकिस राज्य परिवहन प्राधिकरणाचे सदस्य अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) व परिवहन आयुक्त उपस्थित होते.

या बैठकीत महामंडळाच्या पर्यावरणपूरक नविन बीएस ६ मानकाच्या नविन साध्या बसेस टोमॅटो लाल रंगसंगतीस मान्यता देण्यात आली. महामंडळाने ५० ई-बसेससाठी पांढरा व हिरवा रंग तसेच १०० ई-बसेससाठी सद्यस्थितीत चलनात असलेल्या शिवनेरी प्रमाणेच आकाशी रंगसंगतीस मान्यता देण्यात आली. तसेच रेन्ट-ए-कॅब लायसन्स धारकांचे रेन्ट-ए-कॅब लायसन्स नूतनीकरण करण्यास व अर्जदारास नवीन रेन्ट-ए-कॅब लायसन्स जारी करण्यास मान्यता देण्यात आली, असे राज्य परिवहन प्राधिकरणाचे सचिव भरत कळसकर यांनी कळविले आहे.

**अशी आहे भाडेवाढ**

सेवेचा प्रकार : साधी बस - सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. ८.७० रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर, ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १०.०५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) ११ रुपये,

**जलद सेवा (साधारण) :** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. ८.७० रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर, ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १०.०५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) ११ रुपये.

**रात्र सेवा (साधारण बस) :** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. ८.७० रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर, ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १०.०५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) ११ रुपये.

**निम आराम :** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. ११.८५ रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर, ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १३.६५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) १५ रुपये.

**विनावातानुकूलीत शयन आसनी:** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. ११.८५ रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १३.६५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) १५ रुपये.

**विनावातानुकूलीत शयनयान :** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. ११.८५ रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १४.७५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) १६ रुपये.

**शिवशाही (वातानुकूलीत):** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. १२.३५ रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १४.२० रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) १६ रुपये.

**जनशिवनेरी (वातानुकूलीत) :** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. १२.९५ रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १४.९० रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) १७ रुपये.

**शिवशाही स्लिपर (वातानुकूलीत) :** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. १३.३५ रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १५.३५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) १७ रुपये.

**शिवनेरी (वातानुकूलीत) :** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. १८.५० रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर २१.२५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) २३ रुपये.

**शिवनेरी स्लिपर (वातानुकूलीत):** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. २२ रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर २५.३५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) २८ रुपये,

**ई बस ०९ मिटर (वातानुकूलीत):** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. १२ रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १३.८० रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) १५ रुपये,

**ई-शिवाई / ई बस १२ मिटर (वातानुकूलीत):** सध्याचे भाडे प्रति टप्पा ६ कि.मी. १३.२० रुपये, दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून सुधारीत भाडेदर ६ कि.मी.च्या प्रति टप्प्यासाठी प्रवास भाडेदर १५.१५ रुपये, प्रथम टप्प्यात प्रवास भाडेदर (अपघात निधीसह) (१ रुपये पटीत) १७ रुपये.

# उत्तर प्रदेशची भूमी संपूर्ण देशाकरिता वंदनीय - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## राज्यपालांच्या उपस्थितीत राजभवन येथे उत्तर प्रदेश तसेच दादरा, नगर हवेली, दमण आणि दीव केंद्रशासित प्रदेशाचा स्थापना दिवस साजरा.


## उत्कृष्ट सांस्कृतिक प्रस्तुतीकरिता राज्यपालांकडून मुंबई विद्यापीठाला बक्षीस; दोन महाविद्यालयांना देखील बक्षीस जाहीर

**मुंबई**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

उत्तर प्रदेश राज्याचे तसेच दमण, दीव, दादरा - नगर हवेली केंद्र शासित प्रदेश येथील लोकजीवन व संस्कृतीचे राग, ताल व नृत्याच्या माध्यमातून जिवंत दर्शन घडविल्याबद्दल राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबई विद्यापीठाला २५००० रुपयांचे पारितोषिक जाहीर केले. यावेळी सांस्कृतिक सादरीकरणात सहभागी तलासरी येथील कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालय व वाडा येथील डॉ. शांतीलाल धनजी देवशी महाविद्यालय यांना देखील राज्यपालांनी प्रत्येकी २५००० रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून राजभवन येथे राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि. २४) उत्तर प्रदेश राज्याचा तसेच दादरा, नगर हवेली, दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशाचा राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला, त्यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राज्यपालांनी बक्षीस जाहीर केले.

उत्तर प्रदेश भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. उत्तर प्रदेश ही अयोध्येमुळे प्रभू श्री.रामाची, मथुरेमुळे भगवान श्री.कृष्णाची तर




काशीमुळे भगवान शिवाची भूमी असल्याचे सांगून गंगेच्या किनारी वेदांचा उगम झाला असल्याची मान्यता असल्यामुळे उत्तर प्रदेशची भूमी संपूर्ण देशाकरिता वंदनीय आहे, असे राज्यपालांनी सांगितले. उत्तर प्रदेशाचे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही राजकीय विकासात अविस्मरणीय योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. उत्तर प्रदेश तसेच दमण-दीव, दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनेक लोक आज महाराष्ट्राच्या सामाजिक आर्थिक व औद्योगिक विकासात योगदान देत असल्याबद्दल राज्यपालांनी प्रशंसोद्गार काढले. देश प्रजासत्ताकाचा ७५ वा वर्धापन दिन साजरे करीत असताना उत्तर प्रदेश आपला ७५ वा राज्य स्थापना दिवस साजरा करीत आहे तसेच 'जन गण मन' हे भारताचे राष्ट्रगीत होण्याला देखील ७५ वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल राज्यपालांनी आनंद व्यक्त केला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे देशाला उत्कृष्ट राज्यघटना लाभली. विविध कारणांमुळे इतर देशांचे विभाजन झाले तरीही भारत मात्र एकसंध आहे, असे राज्यपालांनी सांगितले. 'एक भारत श्रेष्ठ भारत' कार्यक्रमांतर्गत आयोजित राज्य स्थापना दिवस साजरे केल्यामुळे लोकांचा इतर राज्यांप्रती व तेथील सांस्कृतिक मूल्यांप्रती आदर वाढत आहे. संबंधित राज्यांची भाषा, लोककला, जीवनशैली यांचा सर्वांना परिचय होत असून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होत असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

आजच्या सांस्कृतिक कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी केंद्र शासित प्रदेशांचे तारपा नृत्य, उत्तर प्रदेशचे राज्यगीत, चारकुला नृत्य, भक्तीगीत व कव्वाली सादर केले. तेजल चौधरी या विद्यार्थिनीने कथक व ठुमरी सादर केली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्र संचालन केल्याबद्दल राज्यपालांनी ऋषभ उपाध्याय विद्यार्थ्याला कौतुकाची थाप दिली तसेच रांगोळी कलाकार विलास राहाटे याला दहा हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. राज्यपालांचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी प्रास्ताविक केले तर अवर सचिव विकास कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन मानले. कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाचे प्रकुलगुरु अजय भामरे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. सुनील पाटील, संस्कृत संयोजक निलेश सावे, विद्यापीठातील विद्यार्थी तसेच राजभवन येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# 'इ संजीवनी ओपीडी'द्वारे १ लाख ७४ हजार रुग्णांना मिळाली सेवा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हॅलो डॉक्टरःडोकं दुखतंय, ताप आलाय, घसा खवखवतोय ... ' हा संवाद आहे रुग्ण आणि डॉक्टरांमधला. हा संवाद घडतो तो ई-संजिवनी या ॲपवर. केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने आरोग्यवर्धिनी योजने- अंतर्गत टेलिमेडिसिनद्वारे ऑनलाइन इ-संजीवनी ओपीडी सेवा सुरू केली. आपल्या जिल्ह्यात ऑगस्ट २०२० पासून १ लाख ७४ हजार रुग्णांनी या योजनेचा लाभ घेत घर बसल्या मोफत आरोग्य सल्ला घेतला आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालयात ही सेवा दि.२१ ऑगस्ट २०२० रोजी सुरू झाली. त्यासाठी ६ संगणकांचा कक्ष सुरू करण्यात आला. त्याद्वारे ग्रामीण भागातील रुग्णांना टेलि- कन्सल्टेशनद्वारे जनरल मेडिसिन, स्त्रीरोग, अस्थिव्यंगोपचार, कान, नाक, घसा, बालरोग, नेत्ररोग, मानसोपचार तज्ज्ञांकडून सेवा दिली जाते. आतापर्यंत २० हजार वरून अधिक रुग्णांना यांना थेट इ-संजीवनी ओपीडी ॲप तसेच पोर्टलच्या माध्यामातून कॉल्स करता आले. महत्वाचे म्हणजे ज्यांच्याकडे मोबाईल नाहीत अशा रुग्णांनी सुद्धा जवळील केंद्रात जाऊन अधिकाऱ्यांच्या पोर्टल वर नोंद करून तज्ज्ञांकडून आरोग्य विषयक ऑनलाईन सल्ला घेतला, असे ई- संजीवनी चे नोडल अधिकारी डॉ.भारती नागरे व समन्वयक सोहन ठोंबरे यांनी सांगितले.

या ॲपच्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी वेबसाइट किंवा ॲपवर नोंदणी करता येते. त्यासाठी htt{s://esanjeevani.mohfw.gov.in या संकेतस्थळावर किंवा esanjeevani-MoHFW हे ॲप डाऊनलोड करून स्वतः नोंदणी करावी. आपले आरोग्यासंबंधीचे कागदपत्र अपलोड करावे. त्यानंतर टोकन जनरेट होईल. इ-संजीवनी ओपीडीला गेल्या ४ वर्षापासून चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

रुग्णांना थेट तज्ज्ञांची सेवा या टेलिकन्सल्टेशनद्वारे मोफत मिळते. त्याचा अधिकाधिक रुग्णांनी लाभ घ्यावा. तसेच ॲप मोबाईल मध्ये डाऊनलोड करून घरातील इतर सदस्यांना सुद्धा यात सहभागी करून घ्यावे. ओपीडीची वेळ सकाळी ९ते संध्याकाळी ५ अशी असते.

या वेळेत तुम्ही मोबाइल ओटीपीसह नोंदणी केल्यानंतर त्यावेळेत ऑनलाइन वेटिंग रूममध्ये प्रतीक्षा केल्यावर कॉल नाऊचे बटन सुरू होईल. त्यानंतर रुग्णाला व्हिडिओ कॉलसंदर्भात आमंत्रित केले जाते. व्हिडिओ कॉलवर डॉक्टर रुग्णांशी संवाद साधून डॉक्टर सल्ला देतात. त्यानंतर लगेच इ-प्रिस्क्रिप्शन मिळते. सध्याच्या डिजीटल तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अधिकाधिक रुग्णांनी घरबसल्या या निःशुल्क ऑनलाइन सल्लासुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, अति. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पद्मजा सराफ, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बडे यांनी केले आहे.

# पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा मंगळवारी(दि.२८)

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने मंगळवार दि.२८ रोजी पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती बसस्टँड रोड, मालजीपूरा येथे सकाळी साडेनऊ वा. मेळावा होणार असून जिल्ह्यतील नामांकित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. त्यात मेटलमन ऑटो प्रा.लि., औरंगाबाद अटो कन्सिलरी प्रा.लि., कॉस्मो फिल्मस लि, संजीव अटो पार्टस मोटर प्रा.लि, फोर्ब्स प्रेसीशन टुल्स अड मशिन पार्टस लि, लिभेर अप्लायन्सेस प्रा.लि, अलंकार ग्रूप, ग्रीव्हज कॉटन प्रा.लि, पॅरासन मशिनरी इ.प्रा.लि, मराठवाडा आटो कॉम्पो प्रा.लि, मायलन लॅबोरेटरी लि इ. यात सहभागी होणार आहेत. इंजिनिअरिंग, डिप्लोमा, आयटीआय, एचएससी, एस एस सी उत्तीर्ण इ. पात्रताधारक उमेदवारांसाठी विविध प्रकारची ३७८ पदे उपलब्ध असून पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना रोजगार नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड लॉग इन होऊन ऑनलाईन अर्ज करुन मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अर्ज करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०- २९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र एस. आर. वराडे यांनी केले आहे.

# देशातील प्रत्येक नागरिक सहकार चळवळीशी जोडला जाणार - केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शाह

**मुंबई, (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतातील सहकारी संस्था समृद्ध बनविण्यासाठी सहकार मंत्रालयाने महत्त्वाची पावले उचलली असून देशातील प्रत्येक नागरिक या माध्यमातून सहकारी चळवळीशी जोडला जाईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ध्येयाप्रमाणे आपण जगातील तिसऱ्या महासत्ताकडे वाटचाल करीत असून २०४७ मध्ये आपण पूर्ण विकसित राष्ट्र असू, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ चा आरंभ केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री श्री.शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत गोरेगाव येथे करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार व नागरी विमानचालन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, केंद्रीय सचिव आशीष बुधानी, पंकज बन्सल, तसेच सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा तसेच संपूर्ण देशभरातून सहकार चळवळीशी संबंधित मान्यवर उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळ कार्यालयाचे उद्घाटन, नव्याने स्थापन झालेल्या १० हजार बहुउद्देशीय सहकारी संस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम व उद्घाटन तसेच आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ दरम्यानच्या उपक्रमाचे वार्षिक कॅलेंडरचे विमोचन करण्यात आले.

केंद्रीय सहकार मंत्री श्री.अमित शाह म्हणाले की, अम्ब्रेला संगटनामुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह क्षेत्राला फायदा होणार आहे. ज्याप्रमाणे राष्ट्रीय आणि खासगी बँकेमध्ये सेवा मिळतात, अगदी त्याचप्रमाणे सहकारी बँकेद्वारे सेवा मिळतील. यासाठी सहकारी बँकेच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यात येत आहे. आज एक हजार ४६५ सहकारी अर्बन सहकारी बँका असून त्या महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये आहेत. आगामी काळात वित्तीय व्यवहार हा सहकारी बँकामार्फत होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सहकार क्षेत्राला आत्मनिर्भर बनविण्यासाठी नवीन पिढीने त्याबाबतचे तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. प्रत्येक गावात रोजगार निर्माण करावयाचा असेल तर सहकार क्षेत्राला नवीन आयाम देणे आवश्यक आहे. भारत सरकारने साखर उद्योगासाठी १० हजार करोड रूपयांचा इन्कम टॅक्स माफ केला आहे. काही वाद राहू नये यासाठी कायद्यात सुद्धा सुधारण केली असल्याचे त्यांनी सांगितले. दहा लाख टन साखर निर्यातीमुळे महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना फायदा होणार आहे. आगामी काळात सहकार क्षेत्राला पुढे नेण्याचा संकल्प केला असल्याचेही श्री.शाह यांनी सांगितले.

**महाराष्ट्र : सहकार चळवळीची जननी - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी सहकार क्षेत्राची मूळ बिजं रोवली असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र ही सहकार चळवळीची जननी आहे. सहकार हे कोणाची मत्तेदारी नसून सहकार हा देशाचा प्राण आहे. सहकार आणि साखर उद्योगाला केंद्र सरकारच्या धोरणांमुळे चालना मिळाली. देशातील गावात सहकाराची मुळे मजबूत होत असून मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायट्यांना इज ऑफ डुईंग बिझिनेसमुळे उपयुक्त असे पोर्टल सुरू केले आहे. या पोर्टलमुळे अर्जाची सद्यस्थिती जाणून घेता येते. त्याचबरोबर नवीन १० हजार पॅक्समध्ये फिशरिज, डेअरीची सहकारी संस्था सुरू झाल्या. नाबार्डच्या सहाय्याने देखील ग्रामीण मार्ट सुरू झाले. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, जैविक खते, शेतमालाला बाजारपेठ मिळवून देणे यासाठी राष्ट्रीय पातळीवर बहुउद्देशीय संस्था सुरू झाल्या. किसान क्रेडिट कार्ड आणि मायक्रो एटीएम ही सहकारातील मोठी क्रांती असल्याचे उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले. सहकाराला बळकट करण्यासाठी या सरकारने अत्यंत महत्वाचे निर्णय घेतले असून सहकाराला संजिवनी दिल्याचे सांगून श्री.शिंदे म्हणाले की, राज्यातील ८ हजार पॅक्सचे संगणकीकरण पूर्ण केले आहे. १०० वर्षोपेक्षा जास्त गौरवशाली इतिहास असलेला सहकार आता विदर्भ आणि मराठवाडा या भागात रूजेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**सहकाराच्या माध्यमातून सकारात्मक बदल - उपमुख्यमंत्री अजित पवार**

सहकार चळवळ अतिशय पारदर्शक आणि स्वच्छ पद्धतीने पुढे जाऊन ग्रामीण भागात आर्थिक सुबत्ता नांदत आहे, सहकार चळवळीशिवाय विकास अशक्य होता, असे मत व्यक्त करून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, सहकार क्षेत्राची ताकद ओळखून सहजता, सुलभता आणि पारदर्शकता आणण्यासाठी आणि चळवळीला बळकटी देण्यासाठी सहकार मंत्रालय स्थापन करण्यात आले. सहकाराच्या माध्यमातून आपल्या देशातील शेतकरी, कष्टकरी, महिला, व्यापारी आणि उद्योजक यांना एकत्र आणण्यामध्ये तसेच समाजतील उपेक्षित, दुर्बल घटकांच्या जीवनामध्ये सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी सहकार विभागाच्या क्रांतीकारी निर्णयांमुळे चांगले परिणाम दिसू लागले त स्था स्थापन व्हावी, यासाठी महाराष्ट्रातील सहकार चळवळ पूर्ण योगदान देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र ही सहकाराची पंढरी - केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ**

महाराष्ट्र ही सहकाराची पंढरी आहे, असे सांगून केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, अनेक माध्यमातून निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या ही सहकाराशी जोडली आहे. ग्रामीण भागाला मजबूत करण्यासाठी तसेच रोजगार निर्माण करण्यासाठी सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. पॅक्स मजबूत झाल्यास गावे समृद्ध होण्याबरोबर तेथील गावकरी सुद्धा समृद्ध होणार असल्याचे विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना पुनर्जीवन देण्यासाठी अनेक पाऊले उचलली गेली असल्याचे सांगून

# सिंचन योजनांची १ मार्चपासुन प्रगणना; जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांचे 'वाल्मि'त प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येत्या १ मार्च पासून राज्यात सिंचन योजनांची प्रगणना सुरु होणार आहे. त्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) येथे दि.२० व २१ रोजी पार पडले.

केंद्रशासनाकडून नव्याने सुरु होणाऱ्या लघु सिंचन योजनांची ७ वी प्रगणना व जलसाठा योजनांची दुसरी व मोठ्या;मध्यम प्रकल्पांच्या पहिल्या प्रगणनेसाठी हे राज्यस्तरीय प्रशिक्षण होते. राज्य प्रगणना आयुक्त तथा आयुक्त मृद व जलसंधारण विभाग प्रकाश खपले यांच्या अध्यक्षतेखाली हे प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षणात नि' मध्यम मोठ्या प्रकल्पाची तसेच झऱ्यांची मोबाईल ॲप व वेब पोर्टलद्वारे प्रगणना होणार आहे. प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी अप्पर आयुक्त तथा नोडल अधिकारी (प्रगणना) नितीन दुसाने मृद व जलसंधारण विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सांख्यिकी कक्षातील अधिकारी व कर्मचारी तसेच आयुक्त कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

आता सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी हे आपापल्या जिल्हा कार्यक्षेत्रात जाऊन तेथील प्रगणकांना प्रशिक्षित करतील,असे नितीन दुसाने यांनी सांगितले.

# उत्तरकाशीत भूकंपाचे ३ धक्के!

डेहराडून : उत्तराखंडच्या उत्तरकाशीमध्ये आज, शुक्रवारी सकाळी भूकंपाचे तीन धक्के बसले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ३.५ इतकी मोजण्यात आली. हा भूकंप भूगर्भात ५ किलोमीटर खोलीवर झाल्याचे राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने सांगितले. उत्तरकाशीला आज सकाळी भूकंपाचे तीन धक्के जाणवले. यामुळे लोक घाबरून घराबाहेर आले. या भूकंपाची तीव्रता ३.५ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली. त्याचे केंद्र उत्तरकाशीत होते. भूकंपाचे धक्के सौम्य स्वरुपाचे होते. दरम्यान, स्थानिक प्रशासनाने लोकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, उत्तरकाशीत सकाळी ७.४१ वाजता भूकंपाचा पहिला धक्का जाणवला. यानंतर आणखी एक धक्का बसला. तर सकाळी ८ वाजून १९ मिनीटांनी भूकंपाचा तिसरा धक्का बसला.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816